शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती व प्रसिद्धी करण्याकरीता डिजिटल वॉल पेंटींग या माध्यमाव्दारे काम करण्यासाठी संस्था व दर निश्चित करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज-२०२० /प्र.क्र.११४ (३)/३४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०२ मार्च, २०२१

वाचा :-

माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे क्र.प्रदर्शने/२०२०/६ बाबी/दर व संस्था/का-६ दि.१७.०३.२०२० व दि.१०.१२.२०२० ची पत्रे

प्रस्तावना :-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती व प्रसिद्धी करण्याकरीता विविध माध्यमांचा वापर करण्यात येतो. १) कॉर्पोरेट पुलअप स्टॅण्डीज् २) स्टेज बॅकड्रॉप ३) जाहिरात संदेश विनायल प्रिंटींग,माऊंटींग सह सनबोर्डवर प्रसारित करणे ४) जाहिरात संदेश एलडी फोमशिटवर प्रिंटीगसह प्रसारित करणे ५) जाहिरात संदेश डिजिटल वॉल प्रिंटीग करणे ६) दिर्घकाळ टिकणारे अेसीपी डिस्प्ले बोर्ड (युव्ही प्रिंटीगसह) इत्यादीकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने त्यांच्या स्तरावर जाहिरात देणे निविदा मागवून निवडलेल्या संस्था त्यांच्या दरास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

शासन निर्णय:-

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची डिजिटल वॉल पेंटींग या माध्यमाव्दारे माहिती व प्रसिद्धी करण्याकरीता विविध माध्यमाव्दारे काम करण्यासाठी सदर संस्था व त्यांचे दर यांस खालील अटी शर्तीच्या अधिनतेने शासन मान्यता देत आहे.

१. शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती व प्रसिद्धीकरीता निविदा प्रक्रिया सर्व समावेशक व निकोप होण्याकरीता यापूढे निविदा प्रक्रिया पूर्वनियोजितपणे दरवर्षी विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावी जेणेकरून शासकीय खर्चामध्येही बचत करता येईल.
२. उक्त निविदेमध्ये संस्थेने जून/जुलै, २०१९ मध्ये दिलेले दर आजमितीस देखिल निम्नतम आहेत अशी महासंचालनालयाची धारणा आहे.
३. विषयाधीन निविदा प्रक्रिया, निविदा प्रक्रियेबाबत केंद्र शासनाच्या सर्वसाधारण सी.व्ही.सी. मार्गदर्शक सूचनानुसार महासंचालनालयाने पार पाडली आहे.

४. शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांची अंमलबजावणी परिमाणकारकरित्या होते किंवा कसे याकरीता प्रसिद्धीच्या अंमलबजावणीनंतर त्याबाबतचे फलीत याबाबत शासनास दरमहा अवगत करण्यात यावे.

युनिव्हर्सेल ट्रेडलिंक, अहमदनगर		
अ. क्र.	विभागीय माहिती कार्यालय क्षेत्रे	डिजीटल वॉल पेंटिंग एकूण प्रति चौ.मीटर दर (निविदासुचनेप्रमाणे)
१.	मुंबई शहर व मुंबई उपनगर	१२५९/-
२.	कोकण विभाग (मुंबई महानगर वगळता)	१२५९/-
३.	कोल्हापूर	१२५९/-
४.	पुणे	१२५९/-
५.	नाशिक	१२५९/-
६.	औरंगाबाद	१३६७/-
७.	लातूर	१३६७/-
८.	अमरावती	१३६७/-
९.	नागपूर	१३६७/-

२. **इतर अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील.**

१) उपरोक्त नमुद संस्था व त्यांच्या नावासमोरील दर या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मर्यादेत लागू राहतील.

२) उपरोक्त संस्थेस कार्यारंभ आदेश देताना उक्त कामासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे वैध स्वरुपात संबधित संस्थेकडे असतील याची खातरजमा करुनच कार्यारंभ आदेश देण्यात यावेत व त्याची प्रत विभागास पाठविण्यात यावी.

३) उपरोक्त संस्थेने निविदेमध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक त्या दर्जाच्या माध्यमांचा वापर केला किंवा कसे याची तपासणी अमंलबजावणी यंत्रणा यांच्यामार्फत करण्यात येवून तसे प्रमाणित करण्यात यावे. याकरीता आवश्यकतेनुसार ठराविक Samples प्रयोगशाळेकडून तपासून घेण्यात यावेत.

४) निविदेमध्ये नमुद साहित्याचा दर्जा Delivery Challan मध्येही सविस्तर तपशिल असणे आवश्यक राहील.

५) उपरोक्त संस्थेस देण्यात आलेले काम संबधित संस्था अन्य संस्थेस पोटभाडयाने देणार नाही / Sublet करणार नाही.

६) सदर माध्यमाच्या जाहिरात कामाचे आदेश किमान १० दिवस आधी देण्यात यावेत जेणेकरुन संस्थेला नियोजन करणे व तसेच प्रसिद्धीची उद्दीष्टे साध्य करणे शक्य होईल.

७) उक्त संस्थेस दिलेले प्रसिद्धीचे काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या देयकाबाबतची कार्यवाही १ महिन्यात व त्याच आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावी. याकरीता पुराव्यादाखल विवक्षित भागामध्ये निविदेमध्ये नमूद केलेल्या दर्जानुसार केलेल्या कामाचे फोटो व चित्रिकरण अक्षांश/रेखांश दर्शविणाऱ्या ॲपव्दारे (उदा.Time Lapse Camera App) सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

८) राज्य शासनाच्या प्रसिद्धीचे काम त्याबाबतची परिमाणकारकता या बाबी तपासून याबाबतचा सर्वकष आढावा महासंचालनालयामार्फत घेण्यात यावा व त्याबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३०२१७५१२१४१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfbb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, serialNumber=eb28cc64e4adc3dd948671d0896f641e3e54c25e6deb33a784d0a3d037ae7ff8, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2021.03.02 18:33:53 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

०१.मा.मुख्यमंत्री यांचे अपरमुख्य सचिव
०२.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
०३.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
०४.सर्व विधानपरिषद /विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
०५.महासंचालक,माहिती जनसंपर्क महासंचालनाल, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
०६.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
०७.महालेखापाल (लेखापरिक्षा),महाराष्ट्र१/२,मुंबई/नागपूर.
०८. संचालक (माहिती) (प्रशासन),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
०९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
११.उपसंचालक(लेखा),माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२.
१२.लेखाधिकारी,माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२.
१३.संबंधित संस्था (माहिती जनसंपर्क महासंचालनालयामार्फत)
१४.निवड नस्ती/कार्या-३४